Impact Factor 5.307 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# झाडीबोली व भाषेचा संबंध

**गायत्री गुरव**
पीएच. डी. संशोधक

---

भाषा ही मानवाची अशी एक निर्मिती आहे की, जिच्याविना मानवाची प्रगतीच थांबून जाईल. भाषेविना माणूस काहीच साध्य करू शकला नसता. जगात एकूण २७०० च्यावर भाषा आहेत. तसेच जवळपास ७००० च्या वर बोली आहेत. बोलीतूनच भाषेचा जन्म झाला असे अनेक अभ्यासकांनी म्हटले आहे. जन्मल्यावर नवजात बाळ आपल्यासोबत ध्वनी घेऊन येतो. तीच त्याची स्वबोली असते. याच स्वबोलीच्या आधारावर तो एकाएका अक्षराने वाक्य बोलत असतो. आपण त्याच्या याच स्वबोलीला एक निश्चित आकार देण्याचे काम करीत असतो. म्हणूनच निसर्गाने मानवाला अद्भुत अशी देणगी म्हणजे बोली भाषा दिली आहे.

बोलीला खर तर एक वेगळाच मायेचा स्पर्श आहे. सुरकुत्या पडलेल्या आजीच्या हातावरची त्वचा जशी सैल असते. तिला हात लावल्यावर आपुलकीची जी जाणीव होते. अगदी तसंच काहीसं बोलीभाषेबद्दलची जाणीव आहे. आपली हक्काची माणसं भेटल्यानंतर आपण आपला सगळा दिखाऊपणा झटकून आपल्या स्वतःच्या बोलीत बोलत असतो. खरं तर तिथेच आपुलकीची जाणीव होते. म्हणूनच डॉ. हरिश्चंद्र बोरकर म्हणतात, "संस्कृत ही जरी मराठीची आई असली तरी बोली ही आजी आहे."

परंतु बोली म्हटलं की आपल्याकडे असा समज आहे की, कमी लेखल्या जाणाऱ्या ग्रामीण व मजूर वर्गाशी संबंधित भाषा असा होतो. एखादा व्यक्ती जर आपल्या बोलीमध्ये बोलत असेल तर त्याच्याकडे इतरांचा पाहण्याचा दृष्टिकोन हा निरक्षर व्यक्ती, गमतीशीर बाब किंवा काय खेडवळ माणूस आहे अशी संबोधने वापरण्यात येतील. म्हणून आपली बोली टाकून प्रमाणित भाषा वापरण्याचा समाजाचा कल अधिक दिसून येतो.

बोली ही प्रमाणभाषेच्या अगदी विरुद्ध अशी बोलीभाषा आहे. प्रमाणभाषा ही व्यावहारिक, व्याकरणिकदृष्ट्या वेगळी, समाजातील पांढरपेशा लोकांकडून बोलली जाणारी, साहित्यिकांची वेगळी अशा काही संदर्भानीयुक्त अशी प्रमाणभाषा होय. परंतु बोलीभाषेचे सौंदर्य हे त्या भाषेतील शब्द, वाक्य, म्हणी, वाक्प्रचार यासारख्या भाषिक सौंदर्यांनी नटलेली ही बोली असते. प्रत्येक समाजाची बोली त्या समाजाशी संबंधित रूढी, परंपरा, समजुती, संस्कृती आणि व्यवसाय यासारख्या गोष्टींमुळे समृद्ध बनलेली असते.

बोली ही स्वतःमध्ये खास असणारी आणि इतरांपेक्षा स्वतःचे वेगळेपण जपणारी अशी बोलीभाषा आहे. तरीही लेखन करताना राजकीय, सामाजिक पातळीवर तिचा वापर करताना प्रस्थापित मान्य साहित्याचे अनुकरण केले पाहिजे अशी भीतीयुक्त भावना मानवाच्या मनामध्ये असते. त्यामुळेच बोलींमधील व्याकरणिक आणि शुद्धलेखनाच्या चुका सुधारून त्यांना प्रमाणित भाषेचे रूप दिले जाते. असे करताना मात्र त्या बोलीचे मुळचे रूप जाऊन त्याला प्रमाणभाषेचा दर्जा दिला जातो.

परंतु अलीकडे पाहता बोलीच्या अभ्यासाला आता खूपच प्राधान्य देण्यात येत आहे. याचे कारणही तसेच आहे. जेष्ठ संशोधक गणेश देवी यांच्या काही वर्षाच्या अभ्यासाअंती असे दिसून आले की, भारतातल्या सुमारे २२० बोली ह्या लुप्त झाल्या आहेत. तर काही बोली नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.

बोलीच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या जातात. जसे -

"ज्या व्यक्तीसमुहात आपण पूर्णपणे एकरूप असे भाषिक स्वरूप वापरतो असे वाटते. त्यांची भाषा म्हणजे बोली ही एकरुपता तात्विक स्वरुपाची असते. आणि भाषेच्या सामाजिक प्रश्नात असणे यापेक्षा वाटणे याला बहुतेकवेळा अधिक महत्त्व असते."

(मराठी विश्वकोश, खंड ११)

ही मराठी विश्वकोशातील व्याख्या सुसंगत जरी असली तरी अगदी क्लिष्ट स्वरुपाची वाटते. म्हणूनच बोलीची साधी सरळ व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

"समान ध्वनीचे समुच्चय असणाऱ्या, समान भूभाग असणाऱ्या आणि समान सामाजिक वारसा लाभलेल्या भाषेला बोलीभाषा म्हणतात."

बोलीमध्ये भाषिक बाबींना फार महत्त्व आहे. कारण भाषेच्या विविध स्तरांवरचे वैशिष्ट यामध्ये सामावलेले असते. जसे ध्वनी, उच्चार, शब्दसंग्रह, व्याकरण, अर्थ इत्यादी कोणतेही वैशिष्ट्य तसेच बोली ही कुठे ठसक्यात तर कुठे हेल काढून नाकात बोलणे, विशिष्ट लकबीने विशिष्ट शब्दांचा विशेष उपयोग करणे इत्यादी विविधता बोलीमध्ये दिसून येतो. प्रत्येक बोलींमध्ये ठराविक विशिष्ट बाबीचा संच असतो. या बाबींचा समान विस्तार समान सामाजिक व प्रादेशिक पातळीवर पहावयास मिळतो.

समान भूप्रदेश लाभलेल्या समान भाषिकांची भौगोलिक आणि सामाजिक पार्श्वभूमी त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होत असते. त्यांची भौगोलिक परिस्थिती कशी यावरून त्यांच्या बोलीभाषेमध्ये फरक दिसून येतो. किंबहुना त्या भौगोलिक वातावरणाची वैशिष्ट्ये त्यांच्या भाषेमध्ये दिसून येतात. प्रत्येक बोलीभाषेला स्वतंत्र असे क्षेत्र लाभलेले आपल्याला दिसतात. जसे मराठी ही महाराष्ट्राची भाषा आहे. परंतु मराठीच्या अनेक बोली आहेत. जसे कोकणी, पुणेरी, वऱ्हाडी, खानदेशी, झाडी, मालवणी, अहिराणी अशा अनेक बोली आहेत. प्रत्येक बोलीला स्वतंत्र असे क्षेत्र आहे. जसे - कोकणी बोली कोकणातच वापरली जाते, तर खानदेशी फक्त खानदेशातच वापरली जाते. अर्थात हे सर्व भेद भौगोलिक आहेत. परंतु याशिवाय काही जातिनिष्ठ व समाजनिष्ठ भेदही आहेत. जसे कुणब्यांची वेगळी बोली, पवारांची वेगळी, तेल्यांची वेगळी. या भेदांनाही बोली म्हणता येईल.

ह्या बोली पूर्णतः भिन्न नसतात. त्या आपल्या मुख्य भाषेशी संबंधितच असतात. पुष्कळदा आपल्याला ह्या बोली परिचित असल्याचा भास होतो. ते त्यांच्या बोलीतील समान शब्दांमुळे, वाक्यांमुळे आपल्याला परिचित असल्यासारख्या वाटतात. कधी कधी उच्चारांच्या त्यामुळे बोली वेगळया भासतात. भाषा एकच जरी असली तरी भौगोलिक कारणांमुळे ती वेगळी बोली बनत जाते. नद्या, पर्वत, जंगल इत्यादी विनिमयाला अडथळे आणायचे आणि विनिमयाच्या अडथळयांमुळे एकाच भाषेच्या अनेक बोली निर्माण झाल्या असे आपणास म्हणता येईल. झाडीबोली ही सुद्धा अशाच अडथळयांमुळे निर्माण झालेली बोली आहे. झाडीचा अर्थच मुळात झाड, जंगल यांनी वेढलेला परिसर असे म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांच्या भूभागाला झाडीपट्टी किंवा झाडीमंडळ या नावाने ओळखले जाते. या प्रदेशात बोलली जाणाऱ्या मराठी भाषेच्या अनेक उपबोल्यांपैकी बोलली जाणारी एक बोली म्हणजे झाडीबोली या नावाने प्रचलित आहे.

या झाडीबोलीची अनेक वैशिष्ट्ये सांगता येतात. घनदाट जंगल आणि जंगलातील गावे, नद्या तसेच तलावांचा प्रदेश, रीतीरिवाज, सण, लोकनाट्य, लोककला, दंडार, गोंधळ इत्यादी वैशिष्ट्ये सांगता येतात,

झाडीभाषेमध्ये मराठी सारखे नपुसकलिंग नाही. दाट झाडीमुळे जवळचा माणूस दिसणे अवघड असते. त्यामुळे मोठ्याने ओरडणे हे स्वाभाविकच असते. त्यामुळे येथील लोक पहिले अक्षर जोरात उच्चारतात आणि अंतिम अक्षरांत वर्ण व्यंजनात आले आणि उपांत्य वर्णाचा उच्चार दीर्घ झाला.

मराठी भाषेत झाडीबोलीमध्ये रूढ झालेले 'अक्सेदा देना', 'आनाकानी करणे', 'कनपुटीत देना', 'डोक्स', 'सरम', 'सीडी', 'दवंडी' असे काही शब्द झाडीबोलीत मराठी भाषेशी एकरूप झालेले दिसतात. झाडीबोलीचे सामाजिक संदर्भ देखील भरपूर आहेत. या बोलीवर संस्कृत, हिंदी, तेलगू, गोंडी भाषांचा परिणाम झालेला दिसतो. आता तर थोडाफार इंग्रजीचाही परिणाम होत असल्याचे चित्र दिसत आहे.

दहाव्या शतकापासून जवळपास ५ - ६ शतके गोंड राज्यकर्ते झाडीपट्टीत राज्य करीत होते. असे अनेक नमुने येथे पहावयास मिळतात. खरे तर यामुळे गोंडी भाषेचा मराठी बोलीभाषेवर प्रभाव पडावयास पाहिजे होता. परंतु असे म्हटले जाते की, गोंड राजांनी आपली गोंडीबोली ही घरातच ठेवली आणि बाहेरील व्यवहाराची भाषा मराठीलाच प्रमाण मानले. झाडीचा बराच प्रदेश गोंडी समाजाने व्यापला आहे. परंतु प्रत्यक्ष गोंडी भाषेचा प्रभाव मराठीवर जास्त न पडता झाडीचाच संबंध मराठीशी पहावयास मिळतो. झाडीचा मराठी भाषेशी घनिष्ठ संबंध दिसून येतो. कारण मराठी भाषाही माय बोली आहे. तर झाडी आणि अनेक उपबोल्या तिची लेकरं आहेत. या लेकरांना माय मराठीने आपल्यामध्ये सामावून घेतले आहे.

या प्रदेशात घनदाट अरण्ये असल्यामुळे पावसाचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे बारामाही शेती केल्या जाते. त्यामुळे इथे आर्थिक सुबत्ता भरपूर आहे. सुसंपन्नतेमुळे इथे आळसाला आमंत्रण आहे. म्हणून प्रमाण मराठी मधील 'छ', 'ळ', 'ण', 'श' ही उच्चारण्यात कठीण व्यंजने म्हणूनच झाडीने नाकारलेली आहेत. 'ट्' आणि 'ड्' हे मूर्धन्य उच्चार करण्याची पूर्वतयारी म्हणून त्यापूर्वीच्याच वर्णात त्यांचा स्वीकार करून 'टाट्' (ताट), 'डाट' (दाट) असे प्रमाणभाषेपासून वेगळे शब्द या बोलीने तयार केले आहेत. दाट झाडीमुळे येथील भाषिक पहिला शब्द जोराने उच्चारतात. या जोरात उच्चारण्यामुळे पहिला शब्द जोरात आणि अंतिम शब्दाचा लोक होतो. जसे - 'गाय', 'पाय', 'सवय', 'साय' या शब्दातील अंतिम 'य' चा लोप करून 'गा', 'पा', 'सव', 'सा' असे नवीन पर्याय तयार झाले.

झाडीबोली ही जरी दाट अरण्यातील, जंगलातील बोली असली तरी इथे या बोलीने अनेक साहित्यिक तसेच कवींना जन्म दिला आहे. मराठीतील भवभूति हा विख्यात कवी. हा याच झाडीपट्टीतील कवी होय. त्याचे जन्मस्थान झाडीपट्टीच होय. नाटकाला राजमहालातून सामान्य लोकांमध्ये आणण्याचे काम याच कवीने केले. तसेच कवी दंडी याला दंडार, दंडीगाण या झाडीपट्टीतील लोककलांनी आपल्या नावामध्ये जिवंत ठेवले आहे.

तसेच आपल्या माय मराठीचा पहिल्या काव्यग्रंथ 'विवेकसिंधू' हा मुकुंदराजांनी याच झाडीपट्टीच्या भूमीमध्ये बसून रचल्याचा उल्लेख त्यांनी स्वतः केला आहे. आपले मराठीचे श्रेष्ठ संतकवी तुकाराम महाराज यांचे बरेचश्या अभंगात झाडीबोलीतील शब्दांचा उल्लेख आढळतो.

महानुभाव साहित्य व ज्ञानेश्वरीत झाडी शब्द आढळतात. लीळाचरित्रातील 'डाकरामी व्याघ्र बिंद्रावण' व 'झाडी रामद्रणेचा भेटी' या दोन लीळा झाडीभाषेतील म्हणजे मराठी ग्रंथ लेखनाने सुरुवात झाली. त्यावेळीच झाडीबोलीतील लेखन मिळते, असे प्रतिपादन डॉ. बोरकर यांनी त्यांच्या प्रबंधामध्ये केलेले आढळते.

तसेच मराठीतील अनेक कवी व लेखक झाडीबोलीतून आपले साहित्य मांडण्यास सज्ज झाले आहेत. झाडीबोली ही केवळ त्या चार जिल्ह्यांपुरतीच न ठेवता तिला राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख करून

देण्यास अनेक साहित्यिक पुढे येत आहेत. 'भाराटी', 'बाप्तिस्मा ते धर्मांतर', 'झाडीचा झोलना' इत्यादी उत्कृष्ट कादंबऱ्या तसेच चरित्रे, 'जागली' सारखा सर्वोत्कृष्ट कथांचा संग्रह झाडीबोलीतून पाहायला मिळतो. तसेच अनेक कवितासंग्रह झाडीबोलीतून आजतागायत आपणास पहावयास मिळत आहेत.

झाडीबोलीत प्रमाण मराठीतील सर्व स्वर आहेत. या बोलीत 'छ', 'स', 'श', 'ष' या चार व्यंजनांचे कार्य एकटे 'स' हे व्यंजन करते. नामाच्या लिंगानुसार एकवचनात 'हा', 'ही', 'हे' आणि अनेकवचनात 'हे', 'ह्या', 'ही' अशी सर्वनामे प्रमाण मराठीत वापरतात. परंतु झाडीबोलीत अशी वेगवेगळी सर्वनामे न वापरता 'ह्या' हे एकच सर्वनाम वापरून आपला कारभार चालवितात. झाडीबोलीत केवळ दोनच लिंग वापरतात. ते म्हणजे स्त्रीलिंग व पुल्लिंग. प्रमाणभाषेतील नपुसकलिंग या बोलीमध्ये आढळत नाही. प्रथमपुरुषी अनेकवचनातील 'आमी केलून', 'आमी खाल्लून' अशी वाक्यरचना करतात.

झाडीबोलीतील अनेक वाक्यप्रचारांचा, म्हणींचा अर्थ प्रमाण मराठीमध्ये लागणे कठीण होते. जसे - 'अईन् चईन् रायना' म्हणजे प्रमाण भाषेत 'सुखात राहणे' असा होतो. 'अयलाल् ठिकाण नसना' म्हणजे प्रमाण भाषेत अर्थ 'अद्याप चूल न पेटविणे' असा होतो. 'कानीमानी नाई घेना' म्हणजे 'टाळाटाळ करणे' अशा अनेक शब्दांचा भाषेत अर्थ लागणे कठीण आहे. अशाप्रकारे झाडीबोली आणि भाषेचा अन्योन्य संबंध स्पष्ट करता येतो.

झाडीबोलीचे आतापर्यंत अनेक साहित्य प्रकाशित झाले. त्या साहित्याला मराठीचे अनेक पुरस्कार देखील मिळालेले आहेत. झाडीबोलीतून आतापर्यंत २९ साहित्य संमेलने भरविण्यात आली आहेत. मराठी भाषिक प्रदेशातील रसिकांना झाडीबोलीचा आस्वाद घेण्याकरिता डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी संपादन केलेले 'लाडाची बाई' हे बालमासिक झाडीबोलीतून प्रकाशित केले जाते. मराठीची एक वैशिष्ट्यपूर्ण बोली म्हणून झाडीबोलीचा उल्लेख केला जातो. या झाडीबोलीचा आस्वाद घेण्यासाठी लोकसाहित्य, नियतकालिके, कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्रे, झाडीपट्टीची रंगभूमी इत्यादी साहित्याचा आढावा घेतला की, या झाडीबोलीचा भाषेशी किती घनिष्ठ संबंध आहे याची तुलनाच होऊ शकत नाही. भाषेमुळे मानवाला व्यक्त होण्याची संधी मिळते. त्या संधीचे सोने करायला झाडीतला माणूस पदोपदी सज्जच आहे. आपल्या मातृभाषेबद्दल प्रत्येक मानवाला आदर असतो. त्याहून जास्त अप्रूप त्याला वाटत जेव्हा तो आपल्या स्वबोलीमध्ये काही वाचत असतो, लिहीत असतो, व्यक्त होत असतो.

झाडीपट्टीतील लोकरंगभूमी ही सांस्कृतिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण लोकरंगभूमी आहे. या रंगभूमीवर इथलेच कलाकार नाटक एकपात्री प्रयोग सादर करीत असतात. पूर्वी मराठी भाषा म्हटली की सादर करायचे प्रयोग हे सातारा, कोल्हापूर, पुणेरी एकंदर वऱ्हाडी भाषेतच त्यांची ओळख जगाला व्हायची. पण आता ती ओळख हळूहळू जाऊन तिथे झाडीबोलीचेही वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण झाले आहे. आता झाडीबोलीचेही साहित्य मराठी भाषेची ओळख करून देत राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचत आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मराठी भाषेच्या पार्श्वभूमीवर झाडीबोलीतून प्रदर्शित झालेला सिनेमा 'झॉडीवूड'. मराठी रसिकांना किंवा देश - विदेशातील रसिकांना मराठी भाषेचा आस्वाद एका वेगळ्या बोलीतून सिनेसृष्टीमध्ये घ्यायला मिळणार आहे. आतापर्यंत आपले रसिक बांधव हॉलीवूड, बॉलीवूड, टॉलीवूड असे वेगवेगळे सिनेमांचे प्रकार बघायचे. पण त्यांच्या रसिकतेला टक्कर देण्यास झाडीबोलीतून झॉडीबूड येणार हे त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. तृशांत इंगळेचा 'झॉडीवूड' हा सिनेमा अनेक बाबतीत ऐतिहासिक ठरलेला आहे. दिग्दर्शक तृशांत इंगळे यांनी स्वतः असे म्हटले की, "पूर्वीच्या सगळ्या ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या मराठी सिनेमा सातारा, सांगली, कोल्हापूरची बोली असायची. मग आमच्या झाडीपट्टीतील

नाटकातही तीच बोली असायची. १९९० च्या सुमारास झाडीपट्टीतील नाटककारांची आणि कलावंतांची भाषिक अस्मिता जागृत झाली आणि नाटक झाडीबोलीत येऊ लागली." या सिनेमातले जवळजवळ सगळे संवाद झाडीबोलीत आहेत, असेही ते म्हणतात. म्हणूनच पुढे असे म्हणावेसे वाटते की, सर्वत्र मराठी भाषेचा जयघोष असताना तिची लेकरू असणाऱ्या झाडीबोलीने सुद्धा पुढच्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यास सुरुवात केलेली आहे.

'बोलू बोलीचे बोल!'

संदर्भसूची :-


- डॉ. बोरकर हरिश्चंद्र, 'झाडीबोली : भाषा आणि अभ्यास'.
- डॉ. बोरकर हरिश्चंद्र, 'झाडीबोली मराठी शब्दकोश'.
- मोरे नंदकुमार, 'समाजभाषाविज्ञान आणि मराठी कादंबरी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
- मालशे मिलिंद, 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन', लोकवाङ्मय संग्रह, मुंबई, १९९८.
- डॉ. कांबळे विशाखा, 'झाडीबोली', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
- राकडे औदुंबर, 'बोलीविज्ञान', भाषा विकास संशोधन संस्था, कोल्हापूर.


Research Hub International Journal